




दैनिक **अक्षराज**
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २७९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.२१ मे २०२५


# छगन भुजबळ पुन्हा एकदा झाले मंत्री !!



राज्यपालांकडून छगन भुजबळ यांना मंत्री पदाची शपथ



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, मुंबई :** महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन चंद्रभागा चंद्रकांत भुजबळ यांना राज्याच्या मंत्री पदाची शपथ दिली.

विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधान परिषदेचे अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन मुंबई येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी समारंभात राज्यपालांनी छगन भुजबळ यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे -पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मश्रीफ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, उद्योग, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध व्यवसाय विकास विभाग मंत्री अतुल सावे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट,मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, खासदार प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, राज्यपाल यांचे सचिव प्रशांत नारनवरे, तसेच मंत्री छगन भुजबळ यांचे कुटूंबीय यावेळी उपस्थित होते.

सुरुवातीला मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी शपथविधी सोहळ्यासाठी राज्यपालांची अनुमती मागितली. त्यानंतर राज्यपालांनी छगन भुजबळ यांना शपथ दिली. शपथविधी नंतर राज्यपालांनी भुजबळ यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील भुजबळ यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

# खगोल शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांना मंत्रिमंडळाच्या बैठकीत श्रद्धांजली अर्पण

## भारतीय खगोलशास्त्राचा अध्वर्यू निमाला : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### देशाच्या ज्ञान-विज्ञानाच्या नभांगणातील तेजस्वी तारा निखळला - उपमुख्यमंत्री अजित पवार

जागतिक किर्तीचे ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात देशाला नव्या उंचीवर नेलं. विज्ञानाची सूत्रे, विज्ञानवादी विचार, वैज्ञानिक दृष्टीकोन नव्या पिढीमध्ये रुजवण्यासाठी जीवनभर कार्य केले. विज्ञानाची रहस्ये सहज-सोप्या भाषेत मुलांना समजावून सांगितली. त्यांच्या निधनाने ज्ञान-विज्ञानाच्या प्रसारासाठी वाहून घेतलेला देशाच्या वैज्ञानिक नभांगणातील तेजस्वी तारा निखळला आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणाले की, डॉ. जयंत नारळीकर जागतिक किर्तीचे वैज्ञानिक तसेच विज्ञानवादी विचार समाजात रुजवणारे कार्यशील विचारवंत होते. भौतिकविज्ञान, खगोलविज्ञानाच्या प्रसारासाठी त्यांनी स्थापन केलेली 'आयुका' संस्था ही देशाचं ज्ञानवैभव ठरली आहे. वैज्ञानिक क्षेत्रात स्थूलविश्वाचा उगम व बदलत्या स्वरूपावरच्या संशोधनामुळे जागतिक वैज्ञानिकांमध्ये ते आदरस्थानी होते. 'क्वासी स्टेडी स्टेट थिअरी' संदर्भातील त्यांचं संशोधन मैलाचं दगड ठरलं आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात मांडलेला विज्ञानवादी दृष्टीकोन, अंधश्रद्धेवरचा प्रहार कायम स्मरणात राहील. 'महाराष्ट्रभूषण', 'पद्मभूषण', 'पद्मविभूषण' सारख्या मानसन्मानाने गौरवान्वित डॉ. जयंत नारळीकरांचं निधन ही देशाची कधीही भरून न येणारी हानी आहे. त्यांनी सुरु केलेले विज्ञानप्रसाराचे कार्य पुढे सुरु ठेवणे, विज्ञानवादी दृष्टीकोन समाजात, विशेष करुन भावी पिढीमध्ये रुजवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करुन त्यांना श्रद्धांजली वाहिली.

### जयंत नारळीकर यांच्या निधनाने विज्ञान विश्वात मोठी पोकळी -उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

प्रख्यात खगोलशास्त्रज्ञ, विज्ञानलेखक आणि विज्ञान प्रसारक प्रा. जयंत विष्णू नारळीकर यांच्या निधनाने विज्ञान विश्वात मोठी पोकळी निर्माण झाली आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत.

प्रा. नारळीकर हे जागतिक पातळीवर खगोलशास्त्रात आपल्या संशोधनामुळे ओळखले गेले. त्यांचे कार्य भारतासाठी महत्वाचे होते. मराठी मातीच्या या सुपुत्राने खगोलशास्त्रात मारलेली झेप निश्चितच महाराष्ट्रासाठी अभिमानाची होती.

राज्य शासनाला देखील त्यांनी वेळोवेळी विज्ञान-तंत्रज्ञानाच्या बाबतीमध्ये मार्गदर्शन केलं होतं. पुण्यात 'आंतरविश्व विद्यापीठ' स्थापना करून राज्यात विज्ञान संशोधनाची भक्कम पायाभरणी त्यांनी केली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे महाराष्ट्राला वैज्ञानिक क्षेत्रात आघाडीचे स्थान प्राप्त झाले. त्यांचे निधन हे राज्यासाठी आणि देशासाठी मोठी हानी आहे. नव्या पिढीतील वैज्ञानिक आणि खगोलशास्त्रज्ञ हे निश्चितच डॉ. नारळीकर यांची प्रेरणा घेत राहतील असा मला विश्वास आहे, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणतात.



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, ठाणे :** भारताची विज्ञानाधिष्ठीत प्रतिमा उजळवणारा आणि खगोल शास्त्रातील महत्ता सिद्ध करणारा महान वैज्ञानिक सुपूत्र काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशी शोकभावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पद्धविभूषण, महाराष्ट्र भूषण ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ डॉ.जयंत नारळीकर यांच्या निधनाबद्दल व्यक्त केली आहे. डॉ. नारळीकर यांच्या निधनाने भारतीय खगोलशास्त्राचा अध्वर्यू निमाला, असे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना महाराष्ट्रातील नागरिकांच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. डॉ. नारळीकर यांच्या कन्या गिरीजा यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना सांत्वना दिली.

डॉ. नारळीकर यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार व्हावेत, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी संबंधित यंत्रणाना दिले. दरम्यान, आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनाबद्दल त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, 'भारतीय खगोलशास्त्राचा भक्कम पाया घालण्यात डॉ. नारळीकर यांनी अमुल्य योगदान दिले. गणितज्ञ वडीलांकडून मिळालेला वारसा घेऊन डॉ. नारळीकर यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर खगोलीय शास्त्रातील संशोधनात मोलाची भर घातली. त्यांच्या संशोधनात्मक कार्याला जगभरातील विद्यापीठांनी, संशोधनात्मक संस्थांनी मान्यता दिली. भारतात परतल्यावर त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने 'इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर अस्ट्रोनॉमी ॲंड अस्ट्रोफिजिक्स (आययुसीएए)' आयुका या संस्थेच्या उभारणीची जबाबदारी सोपवली. तीही त्यांनी समर्थपणे सांभाळली. या संस्थेलाही त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र अशी ख्याती मिळवून दिली. 'बिग-बँग थिअरी' वर काम करत असतानाच, त्यांनी आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संघाच्या कॉस्मोलॉजी कमिशनचे अध्यक्षपदही भूषवले.सर्वात महत्वाचे म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या प्रचार-प्रसारातील डॉ. नारळीकर यांचे कार्य देखील असेच भरीव राहिले. त्यांनी विज्ञान लेखक म्हणून केलेली कामगिरी साहित्यिक दृष्ट्या अजरामर अशीच राहील. कारण त्यांनी रसाळ आणि ओघवत्या भाषेत केलेल्या लेखनामुळे नव्या पिढीत, विशेषतः किशोरवयीन मुलांमध्ये विज्ञानाची गोडी वाढीस लागली. 'आकाशाशी जडले नाते' असे पुस्तकरुपातून सांगणाऱ्या डॉ. नारळीकर यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचेही अध्यक्षपद भूषवले होते. त्यांच्या चार नगरांतले माझे विश्व या आत्मचरित्रालाही साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. यातूनही त्यांच्या साहित्यकृतींचे वैशिष्ट्य आणि गुणवत्ता लक्षात यावी. डॉ. जयंत नारळीकर, पुणे या इतक्या पत्त्यावर त्यांच्याकडे लहानथोरांची शेकडो पत्र येत. या पत्रातील विज्ञान विषयक शंका-प्रश्नांचे ते आवर्जून समाधान करत. निखळ वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या प्रसारासाठी ते अखेरपर्यंत निरलसपणे कार्यरत राहीले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील वैज्ञानिक - भारतीय खगोलशास्त्राचे अध्वर्यू ते शाळा-महाविद्यालये-विद्यापीठांमध्ये पोहचून विज्ञान आणि त्यातील गणिती सिद्धांताच्या प्रसारासाठी झटणारा प्रसारक अशी त्यांच्या व्यक्तिमत्वाची व्यापकता होती. डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनामुळे भारतीय वैज्ञानिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. डॉ. नारळीकर यांच्या परिवारावरही आघात झाला आहे. या सर्वांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांना महाराष्ट्राच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.

## थोडक्यात

### बिलोलीत तिरंगा रॅली; पहलगाम हल्ल्याचा केला निषेध



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२०, बिलोली (नांदेड) :** पहलगाम येथे झालेल्या भ्याड आतंकवादी हल्यात निष्पाप भारतीय पर्यटक मारले गेले. त्याबदल्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मॉक ड्रिल करून ऑपरेशन सिंदुरद्वारे पाकिस्तानातील नऊ दहशतवादी तळांवर एअर स्ट्राइक करत या हल्ल्यात किमान १०० दहशतवादी ठार झाल्याची माहिती संरक्षण मंत्रालयाकडून देण्यात आली होती. त्याच वीर जवानांच्या शौर्य व पराक्रमाच्या सन्मानार्थ बिलोलीत भारतीय जनता पक्षाच्या वतीने तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहरातील महा शक्तिशाली दुर्गा माता मंदिर परिसरातून ही तिरंगा यात्रा नाईकवाडी गल्ली, जय मातादी गल्ली, गांधी चौक, जुना बस स्थानक येथून छत्रपती शिवाजी महाराज स्मारक पर्यंत यात्रा काढून तेथे खा. डॉ. अजित गोपछडे, आ. जितेश अंतापुरकर या प्रमुख वत्क्यांची भाषणे झाली. यावेळी प्रामुख्याने माजी सैनिक शंकरराव बोंगाळे, शंकरराव मुंडकर, गंगाधर गायकवाड, संतोष उत्तरवाड, खा. अजित गोपछडे, आ. जितेश अंतापुरकर, माजी महानगराध्यक्ष प्रविण साले, उमाकांत गोपछडे, श्रुती तुडमे, माजी जि. प. सदस्य लक्ष्मणराव ठक्करवाड, सतीश गौड मोतीवार, गणेश पाटील शिंपाळकर, विजयकुमार कुंचनवार, इंद्रजीत तुडमे, हानमल्लु इरलावार, मारोती राहिरे, शिवराजबोधने, राजकुमार गादगे, अभिजीत तुडमे, शांतेश्वर पाटील, दिलीप ऊत्तरवाड, नागनाथ पाटील माचनुरकर, राजेंद्र रेड्डी, हाज्जप्पा पाटील सुंकलोड, लक्ष्मण शेट्टीवार, साहेबराव अंजनिकर, मिराताई संगनोर, शिवकन्याताई सुरकुटलावार, सुलोचनाताई स्वामी, संदीप पाटील, बाबू कुडके, मुन्ना पोवाडे, जावेद शेख, संभाजी शेळके, हानमंतराव कनशेट्टे, शंकरराव परसुरे यांची उपस्थिती होती.

### राज्यात डाळींचा पुरेसा साठा उपलब्ध...
### अफवांवर विश्वास ठेवू नका - प्रशासनाचे आवाहन




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, मुंबई :** चना, तूर, मूग, उडीद आणि मसुर यांसारख्या आवश्यक वस्तूंचा राज्यात पुरेसा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास न ठेवता कोणीही डाळींचा अनावश्यक व जास्तीचा साठा करू नये, असे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने प्रसिद्ध पत्रकान्वये कळविले आहे,

अफवांपासून सावध राहून जबाबदारीने वागण्याचे आणि गरजेपुरतीच खरेदी करण्याचे आवाहन प्रशासनाने सर्व नागरिकांना केले आहे.

### देशात पुन्हा करोनाची दहशत, दोघांचा मृत्यू



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, नवी दिल्ली :** करोनाने पुन्हा एकदा जगात दहशत पसरवण्यास सुरुवात केली आहे. यामुळे आता भारताचंही टेन्शन वाढलं आहे. तर, हाँगकाँग आणि सिंगापूरमध्ये कोरोना व्हायरसच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होताना दिसत आहे. भारतातही काही रुग्ण समोर आले आहेत. केरळ, महाराष्ट्र आणि तामिळनाडूमध्ये सध्या देशातील सर्वाधिक करोना रुग्ण आढळले आहेत, ज्यामुळे सरकारची चिंता वाढली आहे. करोनाच्या वाढत्या रुग्णांबाबत आरोग्य मंत्रालयाने सांगितलं की, सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. वाढत्या प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर एक आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांत दक्षिण भारतातील केरळ आणि तामिळनाडूमध्ये करोनाच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. केरळमध्ये आतापर्यंत ६९ सक्रिय करोना रुग्ण सापडली आहेत. तर, तामिळनाडूमध्ये ३४ सक्रिय रुग्ण आहेत. तर, महाराष्ट्रातही करोनाची ४४ सक्रिय प्रकरणं आहेत. महाराष्ट्रातही आरोग्य विभाग करोनाच्या वाढत्या रुग्णांवर लक्ष ठेवून आहे. याशिवाय कर्नाटक, गुजरात आणि दिल्लीमध्येही करोनाचे रुग्ण आढळून आल्याची माहिती आहे. दिल्लीतही करोनाचं थैमान

सध्या दिल्लीत करोनाचे तीन सक्रिय रुग्ण आढळले आहेत. तर कर्नाटक आणि गुजरातमध्ये अनुक्रमे ८ आणि ६ सक्रिय रुग्ण आढळले आहेत. या व्यतिरिक्त, हरियाणा, राजस्थान आणि सिक्कीममध्ये प्रत्येकी एक सक्रिय रुग्ण आढळला आहे. मुंबईतही करोनामुळे दोन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. आशियाई देशांमध्ये कोरोनाचा पुन्हा प्रसार झाल्यामुळे परिस्थिती आणखी बिकट होत चालली आहे. यामुळे जागतिक स्तरावर पुन्हा एकदा करोनाबाबत चिंता वाढली आहे.




## पाकिस्तानवरील निर्बंध


दहशतवादास अर्थपुरवठा करत असल्याचा आरोप असूनही, कर्जाचा पुढचा हप्ता मंजूर केल्यानंतर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) घातलेल्या नव्या अटी, हा पाकिस्तानसाठी धक्का म्हणावा लागेल; आणि एक प्रकारे हा भारताने घेतलेल्या भूमिकेचा विजयही म्हणावा लागेल. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताचा विरोध असतानाही पाकिस्तानला तातडीने मदत देण्याचा निर्णय नाणेनिधीच्या कार्यकारी मंडळाने घेतला होता. मात्र, तो अधिक सशर्त असल्याचे आता समोर येत आहे. नव्याने घातलेल्या ११ अटींत, कर्जाच्या परतफेडीसाठी पूरक वातावरण निर्माण करण्याचा आणि हे पैसे इतर म्हणजे दहशतवादाला बळ देण्यासाठी वापरू न देण्याचा समावेश आहे. यामुळे पाकिस्तानवरील अटींची संख्या पन्नासांवर पोहोचली आहे.

१७ हजार ६०० अब्ज रुपयांच्या अर्थसंकल्पास संसदेची मान्यता मिळण्याबरोबरच त्यातील मोठा वाटा विकासकामांसाठीच वापरावा, ही प्रमुख अट आहे. त्यासोबतच वीजबिलांवरील कर्ज परतफेड अधिभारावरील कमाल मर्यादा काढून टाकणे, शेती उत्पन्नावर कर लागू करण्यासाठी कायदे करावेत, या अटी पाकिस्तानसाठी डोकेदुखी ठरू शकतात. सोबतच कामकाज सुधारणेसाठी प्रशासन कृती योजना लागू करावी आणि वित्तीय क्षेत्राबाबत रूपरेषा आखावी, अशा मुद्द्यांचा त्यात समावेश आहे. नाणेनिधीने १९५८पासून पाकिस्तानला ५४ वेळा अर्थसाह्य केले; मात्र अजूनही पाकिस्ताने अर्थविषयक सुधारणा केलेल्या नाहीत. सध्या तर महागाई आणि आर्थिक दिवाळखोरीमुळे पाकिस्तानची अर्थव्यवस्था रसातळाला पोहोचली आहे. मात्र, भारताच्या कुरापती काढण्यातच मश्गुल असलेल्या पाकिस्तानी सत्ताधाऱ्यांना पायाखाली काय जळते आहे, याची जाणीव झालेली नाही. वाढता संरक्षणखर्च पाकिस्तानसाठी आणि आता नाणेनिधीसाठीही चिंतेची बाब बनत आहे. काही दिवसांपूर्वी पाक सरकारने २,४१४ अब्ज रुपयांचा संरक्षण अर्थसंकल्प मांडला, भारताशी तणावाचे निमित्त करून तो २,५०० अब्ज रुपयांवर पोहोचला आहे.

'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताने मुरीदके येथील लष्कर-ए-तय्यबा या दहशतवादी संघटनेचा तळ उद्ध्वस्त केल्यानंतर, सरकारी खर्चाने फेरउभारणी करण्याचे आश्वासन तेथील सरकारने दिले. हा दहशतवादाला अर्थसाह्य देण्याचाच प्रकार असल्याच्या भारताच्या आरोपांना त्यातून बळ मिळते. अशा स्थितीत नाणेनिधीलाही आपल्या कर्जाच्या परतफेडीची चिंता वाटणे साहजिक आहे. एकीकडे नाणेनिधीच्या जाचक वाटणाऱ्या अटी लागू केल्या, तर महागाईत भर पडून जनतेचा रोष ओढवून घेण्याचेही आव्हान पाकिस्तानी राज्यकर्त्यांपुढे उभे आहे.

# डॉ.जयंत नारळीकर काळाच्या पडद्याआड

**" जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण डॉ जयंत नारळीकर यांचे काल म्हणजे २० मे रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. "**



डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला.

डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता.

सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला.

**डॉ.जयंत नारळीकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली !**

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# ब्लास्टिंगमुळे दिवे घाटात दररोज 'या' वेळेत वाहतूक बंद

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, हडपसर :** हडपसर-सासवड पालखी महामार्गाचे रुंदीकरणाचे काम सध्या वेगाने सुरू आहे. यामध्ये दिवे घाटातील अवघड घाटमार्ग रुंद करण्यासाठी डोंगरफोड करावी लागत असून, यासाठी मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग केले जात आहे.

ब्लास्टिंगमुळे उडणारे दगड आणि मुरूम रस्त्यावर पडून दुर्घटना होऊ नये, यासाठी दररोज दुपारी १२ ते ३ या वेळेत अर्धा तास हा घाटमार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवला जात आहे. यामुळे वाहनचालक आणि प्रवाशांनी या वेळेत पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन राष्ट्रीय महामार्ग विभाग आणि फुरसुंगी वाहतूक पोलिसांनी केले आहे.



फुरसुंगी वाहतूक विभागाचे पोलीस उपनिरीक्षक शिवाजी माने आणि रस्ता रुंदीकरण कंपनीचे व्यवस्थापक अरविंद श्रीवास्तव यांनी याबाबत माहिती दिली. ते म्हणाले, सत्यपुरम ते दिवे घाट या मार्गावर रुंदीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. दिवे घाटातील कठीण डोंगर फोडण्यासाठी ब्लास्टिंग आवश्यक आहे. ब्लास्टिंगदरम्यान मोठे दगड हवेत उडून रस्त्यावर पडतात, ज्यामुळे दुर्घटनेचा धोका आहे. त्यामुळे दुपारी १२ ते ३ या वेळेत ब्लास्टिंग पूर्ण करून रस्त्यावरील दगड आणि मुरूम हटवण्यासाठी २० ते ३० मिनिटे वाहतूक बंद ठेवली जाते. यावेळी घाटाच्या पायथ्याशी आणि विसाव्याजवळ बॅरिगेटिंग केले जाते.

वाहनचालक आणि प्रवाशांनी या वेळेत हडपसर-सासवड मार्ग टाळून पर्यायी मार्गांचा वापर करावा, अशी विनंती पोलिस आणि राष्ट्रीय महामार्ग विभागाने केली आहे. पर्यायी मार्गाचा वापर शक्य नसल्यास घाटाच्या वर किंवा खाली २० ते ३० मिनिटे थांबावे लागेल, याची नोंद घ्यावी. रस्ता रुंदीकरणाच्या या महत्त्वाच्या कामात नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन माने आणि श्रीवास्तव यांनी केले आहे. रुंदीकरण पूर्ण झाल्यावर हा मार्ग अधिक सुरक्षित आणि सुविधाजनक होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## हे खेळ मनाचे

हे खेळ मनाचे ज्याचे त्याचे
अगदी निरनिराळे
मन कोणाचे वात्सल्य प्रेमाचे
कोणाचे ते अगदी भोळे

हे खेळ मनाचे अनाचाराचे
कपट कारस्थानाचे
मन कोणाचे दुष्ट वासनांचे
कोणाचे ते मळकटलेले

हे खेळ मनाचे स्वार्थ दडलेले
भ्रष्टाचारी वृत्तीचे
मन कोणाचे भलतेच कपटी
पैशाला हपापलेल्या लोकांचे

हे खेळ मनाचे परोपकाराचे
मदतीला धावून जाण्याचे
मन कोणाचे कष्टात रमणारे
आपल्या वडिलांचे

हे खेळ मनाचे माणुसकीचे
कुटुंबव्यवस्था जपण्याचे
मन कोणाचे मायेने भरलेले
आपल्या लाडक्या आईचे

हे खेळ मनाचे खेळकर हसरे
मैत्रीला जपण्याचे
मन कोणाचे पुस्तक खुले
आपल्या बहिण भावाचे

हे खेळ मनाचे तळमळीचे
निस्वार्थ कर्म करण्याचे
मन कोणाचे निर्मळ पाण्याचे
आपल्या आदर्श शिक्षकांचे

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट,ता.अहमदपूर**
**जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## धंगेकरांवर शिंदेंनी सोपवली मोठी जबाबदारी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, पुणे :** भाजपच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावत कसब्याची पोटनिवडणूक जिंकणाऱ्या रविंद्र धंगेकर यांच्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. दोनच महिन्यांपूर्वी काँग्रेसचा हात सोडून सेनेचा भगवा खांद्यावर घेणाऱ्या धंगेकरांना कोणती जबाबदारी मिळणार याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं होतं. याबद्दल बऱ्याच चर्चाही सुरु होत्या. त्यांना आज पूर्णविराम मिळाला आहे.

कसब्याचे माजी आमदार रविंद्र धंगेकर यांची शिवसेनेच्या पुणे महानगर प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विशेष महत्त्वाची मानली जात आहे. महानगर प्रमुखाच्या अंतर्गत दोन ते तीन शहर प्रमुख असतील आणि संपूर्ण पुणे शहरातील संघटनात्मक बांधणी, प्रचार, निवडणूक तयारी आणि स्थानिक पातळीवरील नेतृत्व घडवण्याची जबाबदारी धंगेकरांवर असेल.

# छगन भुजबळ यांचा परिचय



**जन्म :- १५ ऑक्टोबर १९४७.**
**जन्म ठिकाण :- नाशिक.**
**शिक्षण :- एल.एम.ई. (आय), (मेकॅनिकल इंजिनिअर).**
**ज्ञात भाषा :- मराठी, हिंदी व इंग्रजी.**
**वैवाहिक माहिती :- विवाहित, पत्नी श्रीमती मीना.**
**अपत्ये :- एकूण १ (एक मुलगा).**
**व्यवसाय :- शेती.**
**पक्ष :- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.**
**मतदारसंघ :- ११९ - येवला, जिल्हा-नाशिक.**

**इतर माहिती :-** संस्थापक-अध्यक्ष, मुंबई एज्युकेशनल ट्रस्ट, बांद्रा, मुंबई, माजी विश्वस्त, व्हि. जे. टी. आय. संस्था, मुंबई, विश्वस्त, नायर रुग्णालय, विश्वस्त, प्रिन्स आगा स्थान रुग्णालय, मुंबई; संस्थापक, महात्मा फुले समता परिषद, या संस्थेमार्फत उपेक्षित पद-दलित, मागासवर्गीयांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न तसेच, महात्मा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहु महाराज यांच्या विचारांचा व आदर्शाचा प्रचार व प्रसार, ५ नोव्हेंबर २०१० रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांना मुंबई भेटी दरम्यान महात्मा फुले यांनी लिहिलेल्या गुलामगिरी या पुस्तकाचा स्लेव्हरी हा अनुवादीत ग्रंथ भेट दिला; माजी विश्वस्त, मुंबई पोर्ट ट्रस्ट, १९८५ दैवत व १९९०नवरा बायको या मराठी चित्रपटांची निर्मिती; १९७३ सदस्य, १९७३-८४ विरोधी पक्षनेते, १९८५ व १९९१ महापौर, मुंबई महानगरपालिका; याकाळात गृहनिर्माण, झोपडपट्टी सुधारणा, मुंबई शहराचे सौंदर्यकरण, चौकांचे सुशोभिकरण, हुतात्मा चौकाचे सुशोभिकरण केले; १९९१ अध्यक्ष, ऑल इंडिया कौन्सिल ऑफ मेयर्स, १९९१ पर्यंत शिवसेनेत विविध पदावर कार्य; १९९१ नंतर काँग्रेस पक्षात कार्यरत; जून १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; संस्थापक-सदस्य व जून १९९९ ते नोव्हेंबर १९९९ महाराष्ट्राचे पहिले प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; १९८५-९०, १९९०-९५, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा १९९६-२००२ व २००२-२००४ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषदः डिसेंबर १९९१ ते मार्च १९९३ महसूल खात्याचे मंत्री; मार्च १९९३ ते मार्च १९९५ गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधार, घरदुरुस्ती आणि पुनर्बांधणी खात्याचे मंत्री; १९९६-१९९९ विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषदः ऑक्टोबर १९९९ ते जानेवारी २००३ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व गृह आणि पर्यटन मंत्री, नोव्हेंबर १९९९ ते जानेवारी २००३ मुंबई शहराचे पालकमंत्री; जानेवारी २००३ ते डिसेंबर २००३ उपमुख्यमंत्री व गृह मंत्री; नोव्हेंबर २००४ ते ऑक्टोबर २००९ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) या खात्यांचे मंत्रीः नोव्हेंबर २००९ ते नोव्हेंबर २०१० दुसऱ्यांदा उपमुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) खात्याचे मंत्री; नोव्हेंबर २०१० ते सप्टेंबर २०१४ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री व नाशिक जिल्ह्याचे पालक मंत्री; या काळात दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदनाची वास्तु उभी केली, ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवडः जानेवारी २०२० मध्ये अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण खात्याचे मंत्री, नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड

**छंद :** क्रिकेट, चित्रपट, वाचन व प्रवास

**परदेश प्रवास :-** १९८० आणि १९८६ मध्ये अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, नेदरलैंड आणि रशिया या देशाचा अभ्यास दौरा; १९९१ मध्ये ओसाका, जपान येथे जागतिक महापौर परिषदेसाठीच्या शिष्टमंडळासमवेत सहभाग, ऑक्टोबर २००० मध्ये फ्रान्स, जर्मनी व इंग्लंड, दुबई, मस्कत, अबुधाबी, कॅनडा, फ्रान्स, नेदरलँड, बेल्झिअम व स्विझलँड इत्यादी देशांचा अभ्यास दौरा, याच दौऱ्यात लंडन मधील स्कॉटलैंड वार्ड पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर चर्चाः २८ मे २००१ ते १८ जून २००१ या काळात न्युयॉर्क, जिनिव्हा, लंडन इत्यादी देशांचा अभ्यास दौरा तसेच ऑस्ट्रिया, स्वीडन, नॉर्वे, स्पेन इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# विंचूरला आयुर्वेदिक दवाखान्यात २ महिन्यापासून डॉक्टर नाही




मी २ -३ वेळेस या दवाखान्यात गेलो असता, मला एकदा ही डॉक्टर भेटले नाही. याबाबत ग्रामपंचायत व स्थानिक राजकीय पुढारी नेत्यांमध्ये उदासीनता दिसून येते. तरी मी विनंती करतो की, विंचूर गावासाठी त्वरित कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात यावी. अन्यथा नाईलाजास्तव विंचूरकर नागरिकांना आंदोलन करण्याची वेळ येईल. तरी तशी वेळ विंचुरकरांवर येऊन देऊ नये, अशी विनंती आहे. सध्या पाऊस सदृश्य वातावरण आहे. डॉक्टरांची खूप गरज आहे आणि मान. छगनराव भुजबळ यांनाही निवेदन दिले आहे.

**- शैलेश कचोळे (सामाजिक कार्यकर्ते, विंचूर)**

विंचुर येथील आयुर्वेदिक दवाखान्यात डॉक्टर नसल्याने नागरिकांना होणारा त्रास, डॉक्टर नसल्याने रुग्णांना उपचार मिळत नाही. म्हणून हा प्रश्न छगनराव भुजबळ साहेबांकडे मांडून लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करीन.

**- सचिन दरेकर (सरपंच ग्रामपालिका, विंचूर)**

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील लिमगाव वाकडा अंतर्गत उपकेंद्र विंचूर -१ आयुर्वेदिक दवाखान्यात साधारण दोन महिन्यापासून आरोग्य अधिकारी नसल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे. विंचूर येथील आयुर्वेदिक दवाखान्यात दोन महिन्यापासून डॉक्टर नसल्याने नागरिकांचे प्रचंड गैरसोय होत आहे. विंचूर हे गाव नाशिक - छत्रपती संभाजीनगर या राष्ट्रीय महामार्गावर वसलेले आहे आणि कांद्याची मोठी बाजारपेठ आहे. या गावची लोकसंख्या साधारण १५ ते १६ हजार असून, या परिसरात दहा-बारा खेडी आहेत.

तसेच एमआयडीसी क्षेत्र असल्याने रस्त्यावर भरपूर प्रमाणात रहदारी असते आणि अपघात ग्रस्त व्यक्तींना तात्काळ प्रथम उपचार होणे खूप गरजेचे असते, परंतु विंचूर गावी आयुर्वेदिक दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी नसल्याने नागरिकांना औषध उपचार मिळत नाही. त्यामुळे विशेषतः गोरगरीब लोकांचे औषध उपचार वाचून फार हाल होत आहे.

याबाबत नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांना अनेक तक्रारी करूनही अद्याप पर्यंत कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकार्यांची नेमणूक केली नाही. नागरिकांची संतापजनक प्रतिक्रिया लवकरात लवकर वैद्यकीय अधिकारी न आल्यास वैद्यकीय अधिकारी कार्यालया समोर आंदोलन छेडण्याचा विंचूर वासियांनी इशारा दिला आहे.

# थोडक्यात

## अभिजित आहेरचे युपीएससी परीक्षेत यश

### पळसपूर ग्रामस्थांतर्फे सत्कार सोहळ्याचे आयोजन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पळसपूर गावचे सुपुत्र, अभिजित सहदेव आहेर यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ७३४ रँक मिळविल्याबद्दल पळसपूर ग्रामस्थांतर्फे त्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या सोमवार, दिनांक २६ मे २०२५ रोजी पळसपूर येथे सायंकाळी ६ वाजता आमदार काशिनाथ दाते, माजी आमदार नंदकुमार झावरे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, शिवाजी शिर्के तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी संपतराव भोसले यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास भाजप नेते विश्वनाथ कोरडे, युवा नेता सचिन पाटील वराळ, डॉ भास्कर शिरोळे, शिवसेना तालुकाप्रमुख डॉ.श्रीकांत पठारे, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, पोलिस निरीक्षक समीर बारवकर, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी किसनराव पावडे, ऍड.बाळासाहेब लामखडे, कन्हैया उद्योग समूहाचे अध्यक्ष मच्छिंद्र लंके, प्राचार्य भास्कर झावरे,डॉ भाऊसाहेब खिलारी, प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव मतकर, वसंत कवाद, सोमनाथ वरखडे, ऍड.रामदास घावटे हे उपस्थित राहणार आहेत. दरम्यान दुपारी अभिजित आहेर यांची भव्य स्वागत मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन पळसपूर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मुदखेड रेल्वेची तक्रार थेट मुख्यमंत्र्यांच्या दालनात

### फुल वाहतुकीवर घातली बंदी; काँग्रेसची पालकमंत्री सावेंशी चर्चा




**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२०, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड रेल्वे च्या हेकेखोर वृत्तीने रेल्वेतून फुलांच्या वाहतुकीवर बंदी घातली असून त्यामुळे फुल शेतकरी आणि व्यापारी अडचणीत आला आहे. यासंबंधी आता काँग्रेस शिष्टमंडळाने पालकमंत्री अतुल सावे यांची भेट घेऊन सकारात्मक चर्चा केल्यानंतर संबंधित विषय गंभीर असून तातडीने मुख्यमंत्र्याच्या कानावर विषय घालून हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी त्यांनी शिष्टमंडळाला दिले.

मुदखेड तालुक्यात शेतकऱ्याकडून विविध प्रकारच्या फुलांच्या लागवड केली जाते. जरबेरा, शिर्डी गुलाब, काकडा, शेवंती, मोगरा, चमेली, गलांडा, पांढरा गुलाब, बिजली, झेंडू आदी नानाविध प्रकारची एक हजारांच्या जवळ फुलांची मळे तालुक्यांत आहेत. तेलंगणा, आंध्र प्रदेश, मुंबई, दिल्ली तसेच महाराष्ट्रातील विविध शहरांत मुदखेड शहरांतून फुलांची निर्यात करण्यात येते. एका महिन्यांपूर्वी फुल शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी मुदखेड येथील फुल व्यापाऱ्यांनी स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे फुलांची आवक वाढली असून शेतकऱ्यांना फुलांचा योग्य दर मिळतो आहे. परंतु रेल्वे प्रशासनाने फुलांच्या वाहतुकीला बंदी घातल्याने फूल शेतकरी आणि व्यापाऱ्यांवर मोठे संकट निर्माण झाले आहे.

मुदखेड रेल्वेने फूल वाहतुकीवर बंदी घातल्यामुळे प्रा.संदीपकुमार देशमुख यांनी पालकमंत्री अतुल सावेंशी संपर्क केला असता नांदेड येथे तात्काळ भेटीला यावे असे सांगितले. यावेळी तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, शहराध्यक्ष कैलास गोडसे, प्रा. संदिपकुमार देशमुख यांनी पालकमंत्री अतुल सावे यांची विश्रामगृह येथे भेट घेऊन लेखी निवेदन देत 'मुदखेड' रेल्वेच्या हेकेखोरपणा विषयी चर्चा करीत फुलांच्या वाहतूक बंदीमुळे फुल शेतकरी व फुल व्यावसायिकांचे नुकसान निदर्शनास आणुन दिले. संबंधित विषय गंभीर असुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी लागलीच चर्चा करून रेल्वे विभागाला वठणीवर आणत प्रश्न कायम स्वरूपी निकाली काढण्यात येईल, असे आश्वासन यावेळी त्यांनी शिष्टमंडळाला दिले.

**पालकमंत्री सावे यांचा हजरजबाबीपणा**

नांदेड येथील सह्याद्री विश्रामगृहातील कॅबिन मधून बाहेर येताच रेल्वे विभागाच्या संदर्भातील निवेदन सादर करणारे शिष्टमंडळ कुठे आहे असे विचारताच काँग्रेसच्या शिष्टमंडळाने मुदखेड रेल्वेच्या हेकेखोरपणाचे निवेदन सादर केले. विषय समजून घेतल्याने संबंधित निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर करून लवकरच तोडगा काढून यासंबंधी आपणास कळवू असे आश्वासन यावेळी पालकमंत्री सावे यांनी शिष्टमंडळाला दिले.

## मनपा पाणीपुरवठा विभागाच्या धडक कारवाईत ३० टिल्लू पंप जप्त



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** शहरातील बालाजी वार्ड, बालाजी मंदिर, मातोश्री शाळेमागील परिसर, महाकाली मंदिर परिसरात महानगर पालिकेमार्फत टिल्लू पंप जप्तीची मोहीम राबविण्यात येऊन ३० ग्राहकाचे टिल्लू पंप जप्त करण्यात आले असून त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करुन नळ कपात करण्यात आली आहे. मनपातर्फे शहरातील सर्व नळ जोडणीवर जलमापक (मीटर) लावण्यात आले असून मीटरचा प्रत्यक्ष वापर सुरु आहे. मात्र, काही जागी मीटरला लावलेला पाईप काढून पाणी भरत असल्याचे तसेच काही नागरिक टिल्लू पंपचा वापर करत असल्याचे आढळून आल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन जप्ती करण्यात आली आहे. सर्व नळ जोडणींवर मीटर लावण्यात आले असल्याने पाण्याचा जेवढी वापर होईल तेवढेच देयक येत असून अनावश्यक खर्च व अनावश्यक पाण्याच्या वापरावर नियंत्रण आले आहे. मात्र, काही नागरिक वंशाचे देयक कमी करण्याच्या दृष्टीने मीटरला लागून असलेला पाईप काढतात ज्यामुळे पाण्याचा वापर करताना मीटर बंद असते व बील अतिशय कमी येते. शिवाय टिल्लू पंपद्वारे मोठ्या प्रमाणात पाणी एकांत कनेक्शनवर ओढले जाऊन इतर नळधारकांना अतिशय कमी प्रमाणात पाणी पुरवठा होतो. त्यामुळे शहरातील पाणीपुरवठ्यावर होणारा परिणाम लक्षात घेता मनपातर्फे कारवाई सुरु असून यापुढे अशाप्रकारे पाणी भरताना आढळल्यास त्यांना काळ्या यादीत टाकणार येणार असल्याचे महानगरपालिकेतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

## घरकुल लाभार्थ्यांना तात्काळ वाळू उपलब्ध करून देऊ - तहसीलदार शिंदे




**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२०, बिलोली (नांदेड) :** अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने बिलोली तहसील कार्यालयासमोर मंगळवार, दिनांक २० मे २०२५ रोजी धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदार गजानन शिंदे यांनी भेट देऊन लवकरच घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळु उपलब्ध करून देण्यात येईल यासह अन्य मागण्यांचे आश्वासन दिले. तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास मोफत वाळू देण्यात यावी. निराधार लाभार्थ्यांना गेल्या ५-६ महिन्यापासून त्यांचे अनुदान थकले असून त्यांना तात्काळ अनुदान उपलब्ध करून देण्यात यावे, राशन कार्ड धारकांना राशन मिळत नाही अशांना राशन देण्यात यावे. नवीन नावाचा समावेश करण्यात यावा, तालुक्यातील अवैध वाळू, गिट्टी, मुरूम, माती वाहतूक करणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. या मागणीसाठी उपोषण करण्यात आले होते. गेल्या अनेक दिवसांपासून तालुक्यातील मांजरा नदी पात्रातून खाजगी परवानगीच्या नावाखाली अवैध रेती उपसा व वाहतूक रात्रंदिवस जोर धरला असून याकडे संबधीत महसुल प्रशासन दुर्लक्ष करत आहेत.

तर घरकुल लाभार्थ्यांना शासन निर्णय आसुन देखील रेती मिळत नाही पण अवैध वाळू उपसा करून लाखो रुपये कमवण्याचा धंदा तालुक्यात जोर धरला आहे. याकडे संबंधित प्रशासकीय यंत्रणा व आरटीओ विभाग याकडे अर्थपुर्ण कानाडोळा करत असल्याने अवैध धंदेवाले डोकेवर काढले असुन आरटीओ मात्र कुठे आहेत असा सवाल नागरिक करत आहे. वाहनावर कारवाई करण्याचा अधिकार आरटीओला असताना मात्र त्यांची नाममात्र देखील कार्यवाही नाही. जर उपोषण कर्त्यांना तहसिलदार गजानन शिंदे यानी दिलेले आश्वासन पाळले गेले नाहीत तर समितीच्या वतीने अवैध वाहतुकीची व ओव्हिरलोंडीग वाहणे अडवुन महसुल व पोलीस विभागाच्या ताब्यात देणार आसल्याचे तहसिलदारासमोरच भावना व्यक्त करत एक दिवशीय आंदोलन तात्पुरते मागे घेतले. सदर उपोषणात राष्ट्रीय सरचिटणीस राजु पा. शिंपाळकर, जिल्हाध्यक्ष शंकरराव मावलगे सो.मिडीया जिल्हाध्यक्ष सय्यद रियाज, गंगाधर शिंदे तालुका अध्यक्ष, सुनिल जेठे ता.उपाध्यक्ष, इब्राहीम इनामदार केसराळीकर,आत्माराम पा. हनिफ इनामदार, संभाजी नरवाडे, ईश्वर जाहुरे, शिवानी देशमुख, राजेश्री भरांडे, शंकर पवार, शेख आस्मा यांच्यासह अनेकांनी सहभाग नोंदविला.

## आ.मुनगंटीवार यांची केरळचे अतिरिक्त मुख्य सचिव ज्योतिलाल यांच्यासोबत बैठक



**अक्षराज : वसंत वास्कर**

**दि.२०, तिरुअनंतपुरम :** महाराष्ट्राचे माजी अर्थमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी तिरुअनंतपुरम येथे केरळच्या लॉटरी मॉडेलचा सखोल अभ्यास करण्याच्या दृष्टीने भेट दिली. यावेळी केरळचे अतिरिक्त मुख्य सचिव के.आर. ज्योतिलाल यांच्यासोबत त्यांची महसूल वाढीच्या संधींबाबत व्यापक चर्चा झाली. 'केरळची यशस्वी लॉटरी योजना महाराष्ट्राच्या अर्थकारणाला नवी दिशा देणारी ठरेल, असा विश्वास यावेळी राज्याचे माजी अर्थमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. सचिवालयात पार पडलेल्या या बैठकीला आमदार रोहित पाटील आणि इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी केरळ लॉटरीच्या उपसंचालक स्टेफिना रॉड्रिग्ज यांनी आ.मुनगंटीवार यांचे स्वागत केले. आमदार सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले, ही योजना केवळ महसूलवाढीपुरती मर्यादित नाही, तर रोजगार निर्मिती आणि सामाजिक कल्याणाचा प्रभावी स्त्रोत ठरेल. या चर्चे दरम्यान, लॉटरी योजनेतील पारदर्शकता, सामाजिक विश्वास, आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग यावर विशेष भर देण्यात आला. केरळ मॉडेलमध्ये राज्यातील जनतेचा लॉटरी व्यवस्थेवर प्रचंड विश्वास आहे आणि हीच गोष्ट त्याच्या सातत्यपूर्ण यशामागील खरी ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले. या बैठकी दरम्यान केवळ लॉटरीच नव्हे तर केरळचे एकूण आर्थिक आरोग्य, मसाल्यांच्या व्यापाराचे महत्त्व आणि राज्याच्या ऐतिहासिक परंपरेचा आर्थिक विकासाशी असलेला संबंध या मुद्द्यांवर ही चर्चा करण्यात आली.

## महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे नांदेड विमानतळ हस्तांतरण प्रक्रियेस प्रारंभ

### अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पांडे यांनी केली विमानतळ व परिसराची पाहणी



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, नांदेड :** नांदेड येथून सध्या अनेक मोठ्या शहरात विमानसेवा सुरु आहे. नांदेड येथील विमानतळ सध्या एमआयडीसीच्या ताब्यात असून लवकरच ते महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्यात येणार आहे. यासाठी आज महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी विमानतळ परिसराची पाहणी करुन औद्योगिक विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे एसआर मॅनेजर रोहित राहपाडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी निशिकांत देशपांडे, नियोजन अधिकारी भक्ती चितळे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र गावडे, कार्यकारी अभियंता कल्पेश लहीवाल, मो जावेद व बेग उप अभियंता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे वरिष्ठ अधिकारी आदीची उपस्थिती होती.

विमानतळावरील विविध सुविधांबाबत औद्योगिक विकास महामंडळाने येत्या तीन महिण्यात सुधारणा करावी. विमानतळावरील अनधिकृत बांधकाम हटविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी सूचना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे केली.

तसेच विमानतळावरील मनुष्यबळ भरती प्रक्रीया, पाणीपुरवठा तसेच विद्युत पुरवठा सुरळीत होईल यांची दक्षता घेणे. विमानतळावर प्रवाशांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधामध्ये सुधारणा करण्याबाबत सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच येत्या तीन महिण्यात या सर्व सुविधा उपलब्ध केल्या नंतर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे विमानतळ हस्तातंरणाची कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी विमानतळावरील धावपट्टी, ॲब्युलन्स, अग्निशामक व इतर आवश्यक त्या वाहनाची, तसेच स्कॅनर मशिन अशा सर्व बाबीची पाहणी केली.